हॅलो प्रभात

01.03.2025

# विवेकानंद महाविद्यालयात वादविवाद स्पर्धेचे आयोजन

कोल्हापूर : हॅलो प्रभात

विवेकानंद महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागात २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मराष्ट्रीय विज्ञान दिवसफसाजरा करण्यासाठी वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या



विशेष कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभाग व अंतर्गत गुणवत्ता आश्वासन समितीच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

स्पर्धेत महाविद्यालयातील बीएससी भाग १,२, आणि ३ च्या विद्यार्थ्यांनी उत्साही व सक्रियपणे सहभाग घेतला. यावर्षीचे वादविवादाचे विषय अत्यंत आकर्षक होते. आधुनिक तंत्रज्ञान - शाप की वरदान? , पाळीव प्राणी जतन करणे योग्य की अयोग्य? आणि संशोधनात प्राण्यांचा उपयोग करणे योग्य की अयोग्य? विद्यार्थ्यांनी आपल्या विचारांची अत्यंत ठाम आणि प्रभावी मांडणी केली, ज्यामुळे स्पर्धा खूपच रोचक व आकर्षक ठरली.

या स्पर्धेत ३२ विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. परीक्षक म्हणून डॉ. सलमा मुल्ला यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि त्यांच्या विचारांना गती दिली. स्पर्धेचे प्रात्यक्षिक डॉ. टी. सी. पाटील यांनी केले, तर कु. नम्रता जाधव यांनी आभार प्रदर्शन केले.

04/03/2025

हॅलो प्रभात

दि. 01.03.2025

# युवकांनी खेळाकडे आवड म्हणून पाहावे : दीनानाथ सिंह

## विवेकानंद कॉलेजमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात

कोल्हापूर : हॅलो प्रभात

जुन्या काळातील कुस्ती आणि आजच्या काळातील कुस्तीमध्ये जमीन आस्मानचा फरक पडला असून युवकांनी खेळाकडे व्यावसायिक दृष्टीकोनातून न पाहता आवड म्हणून खेळ जोपासले पाहिजेत. विवेकानंद कॉलेजने विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांना नेहमीच प्रोत्साहन देऊन विविध व्यासपीठातून कोल्हापूरामध्ये क्रीडासंस्कृती रुजविली. विवेकानंद कॉलेजने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नामवंत खेळाडू तयार केले. मर्यादा लक्षात घेऊन एखादे क्षेत्र निवडल्यास यश नक्कीच मिळते.

ते पुढे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी तीन दगडांच्या चुलीचा संस्कार करण्याऐवजी समाजाचा संसार सांभाळण्याचे काम प्राचार्य अभयकुमार साळुंखे करीत आहेत. असे प्रतिपादन सिंह यानी केले. ते विवेकानंद च्या वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी कार्याध्यक्ष मा.प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते. अध्यक्षीय मनोगतात साळुंखे यांनी,



विवेकानंद कॉलेजच्या गुणवंत विद्यार्थ्यांनी शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांनी सांगितलेल्या पंचसुत्रीचा अवलंब करुन महाविद्यालयाचा व संस्थेचा नावलौकिक वाढवावा. वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळते.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्राने गौरविण्यात आले. आदर्श विद्यार्थी प्रविण जामखंडे, आदर्श समृध्दी माने, आदर्श क्रीडा विद्यार्थिनी गायत्री लोळगे, आदर्श सुयश झुणके, आदर्श, प्रज्योत गायकवाड, आदर्श एन.सी.सी.कॅडेट समिधा घुगरे यांना शिष्यवृत्ती देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी, प्रा.संजय थोरात, डॉ. ई.बी.आळवेकर, डॉ.जी.जे.नवाथे, डॉ. आरिफ महात, मेजर सुनिता भोसले, लेफ्टनंट जे आर भरमगोंडा, प्रा.सौ. शिल्पा भोसले, प्रा.विश्वंभर कुलकर्णी, प्रा. एम.आर.नवले, प्रा.गीतांजली साळुंखे, प्रा.के.जे.गुजर, प्रा समीर पठाण, प्रा.प्रशांत कांबळे, हितेंद्र साळुंखे, रजिस्ट्रार आर.बी.जोग तसेच प्राध्यापक, प्रशासकीय सेवक वर्ग व विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

03/03/25

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, १ मार्च २०२५

# ‘विवेकानंद’मध्ये वादविवाद स्पर्धेस प्रतिसाद

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. याला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. परीक्षक म्हणून डॉ. सलमा मुल्ला यांनी काम पाहिले. स्पर्धेचे प्रात्यक्षिक डॉ. टी. सी. पाटील यांनी केले. नम्रता जाधव यांनी आभार मानले. प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे नियोजन करण्यात आले.

# सतीश तांदळे यांची अभ्यास मंडळावर निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



युवा लेखक, अभिनेता व दिग्दर्शक सतीश सदाशिव तांदळे यांची विवेकानंद महाविद्यालयाच्या अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून निवड केली आहे. इंग्रजी भाषा व साहित्य या विषयावरील अभ्यासक्रम तयार करण्याची जबाबदारी या मंडळावर राहणार आहे. ते इंग्रजीतील प्रसिद्ध साहित्याचे मराठी भाषेत नाटक, एकांकिका याद्वारे सादरीकरण करत असतात. राज्य नाट्य स्पर्धेत त्यांनी दिग्दर्शित केलेल्या संगीत 'मतिविलय' या नाटकाला प्रथम क्रमांक मिळाला आहे.